नियमित दिवाणी दावा क्र.५६/२०२३
सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००२८०–२०२३

## निशाणी क्र.६१ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीतर्फे कथन असे की, सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द वाटपाकरिता दाखल केलेला आहे. सदरहू कामी प्रतिवादी क्र.२ ते ८ व १० यांचे आडनाव मेस्त्री म्हणून नमुद केलेले आहे. प्रतिवादी क्र.२ ते ८ व १० यांना बेलीफ बजावणी करणेसाठी गेले असता त्यांचे आडनाव पांचाळ असलेमुळे त्यांनी सदर दाव्याची बजावणी करुन घेतलेली नाही. तरी प्रतिवादी क्र.२ ते ८ व १० यांचे आडनावात 'मेस्त्री' ऐवजी 'पांचाळ' असा बदल करुन सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती दाव्यात करुन मिळणेचा आदेश व्हावा अशी विनंती केली आहे. तसेच सदर दुरुस्तीमुळे मूळ दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणारा नाही. सबब, अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले नाही त्यामुळे त्यांच्या विरुध्द विना म्हणणे असा आदेश करण्यात आला.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी वाटप होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

५. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणी अद्याप पावेतो मुद्दे निश्चीती झालेली नसल्याने प्रस्तुत दावा हा अद्याप पावेतो सुनावणीस लागलेला नाही. वादी यांनी त्यांच्या अर्जात केलेली मागणी तांत्रिक स्वरुपाची

आहे. प्रस्तुत मागणी केल्यास दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होणारा नाही. याउलट प्रस्तुत दाव्याचा न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना आणि वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपूर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्तवाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज नि.क्र.६१ मंजूर करण्यात येतो.

२. वादीने १४ दिवसांच्या आत सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.10.03 16:37:18 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )

दिनांकः ०३/१०/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड